महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
३,महापालिका मार्ग,टपालपेटी क्रमांक १००३६, मुंबई ४००००१.
WWW.DVET.GOV.IN e-mail::DVETEXAMS@YAHOO.COM/desk9@dvet.gov.in
TEL 022--22620293/226201008/022-22620603/604/**022-22694596**

क्र९./सीटीएसपरीक्षा/२०२०/३२५
दिनांक :- ११/११/२०२०

प्रति,

सहसंचालक ,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय - शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गतची अखिल भारतीय व्यवसाय सत्र व वार्षिक परीक्षा नोव्हें - २०२० इंजिनियरींग ड्रॉइंग विषयासाठी परीक्षा केंद्रावरील बैठकीबाबत.
संदर्भ- सहसंचालक प्रा.का.नाशिक यांचे पत्र क्र.प्राकाना/प्रशि/क-२/२०२०/६५९५ दि.०५.११.२०२०

अखिल भारतीय व्यवसाय सत्र व वार्षिक परीक्षा २०२० इंजिनियरींग ड्रॉइंग विषयाच्या परीक्षेबाबत नाशिक विभागातील घोषीत केलेल्या केंद्रांवर कोव्हीड -१९ च्या नियमांचे पालन करतांना काही परीक्षा केंद्रांवर परीक्षार्थी संख्या जास्त असल्यामुळे इंजिनियरींग ड्रॉइंग विषयाची परीक्षा आयोजित करणे जिकीरीचे होणार असलेबाबत संदर्भिय पत्रान्वये प्रा.का.नाशिक यांनी संचालनालयास अवगत केले आहे.

सदर बाब विचारात घेता सहसंचालक प्रादेशिक कार्यालय (सर्व) यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय व्यवसाय सत्र व वार्षिक परीक्षा २०२० इंजिनियरींग ड्रॉइंग विषयाच्या परीक्षेसाठी परीक्षा केंद्रांवर कोव्हीड -१९ च्या नियमांचे पालन करण्यासाठी परीक्षार्थी संख्या जास्त असल्यास इंजिनियरींग ड्रॉइंग विषयाच्या परीक्षेसाठी एक वेळची बाब म्हणून परीक्षा केंद्रांना आवश्यकतेनुसार सुविधा असलेल्या अन्य नजीकच्या ठिकाणी परीक्षेची व्यवस्था करण्यास हरकत नाही. त्या अनुषंगाने संबंधितांना आपले स्तरावरून अवगत करण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

(दि.अं.दळवी)
उपसंचालक

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव -

१. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी
२.सर्व शासकीय/अशासकीय औ.प्र.संस्था.